महाराष्ट्र शासन

# शासकीय निवासी महिला तंत्रनिकेतन, लातूर

बार्शी रोड, लातूर–४१३५३१ दुरध्वनी क्र.०२३८२-२२११८४ (O), २२११७५ (P)
ईमेल:- office.grwplatur@dtemaharashtra.gov.in, 0136office@msbte.com,
principal.grwplatur@dtemaharashtra.gov.in, 0136principal@msbte.com
website : www.grwpl.org.in DTE Code : 2016 MSBTE Code : 0136

जा. क्र. शानिमतंला/विवि /२०२४ / १७१५ दि. ०४/१०/२०२४

**महत्वाची सुचना:-**

**विषय:- सन २०२४-२५ करीताचे शिष्यवृत्ती अर्ज भरणे बाबत.**

**संदर्भ:- या कार्यालयाची नोटीस क्र. १४८१, दि. १३/०९/२०२४**

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये सन २०२४-२५ करीताचे शिष्यवृत्ती अर्ज भरण्याबाबत संस्थेतील सर्व विद्यार्थीनीना खालीलप्रमाणे सुचना देण्यात येत आहेत.

- **संस्थेतील नियमित द्वितीय व तृतीय वर्षातील विद्यार्थीनींसाठी:-**

१. संस्थेतील व्दितीय व तृतीय वर्षातील महाडीबीटी पोर्टलवरील शिष्यवृत्तीधारक विद्यार्थीनींनी सन २०२४-२५ करीताचे ऑनलाईन शिष्यवृत्ती अर्ज दि. १५/१०/२०२४ रोजीपर्यंत भरावेत व अर्जाची झेरॉक्स प्रत शिष्यवृत्ती विभागात देवून शिष्यवत्ती नोंदवहीत अर्ज जमा केल्याची स्वाक्षरी करावी.

२. संस्थेतील व्दितीय व तृतीय वर्षातील प्रगती शिष्यवृत्तीधारक विद्यार्थीनींनी सन २०२४-२५ करीताचे प्रगती शिष्यवृत्ती अर्ज दि. ०५/१०/२०२४ रोजीपुर्वी भरून अर्जाची झेरॉक्स प्रत शिष्यवृत्ती विभागात विभागात देवून शिष्यवत्ती नोंदवहीत अर्ज जमा केल्याची स्वाक्षरी करावी.

- **संस्थेतील प्रथम व थेट द्वितीय प्रवेशीत विद्यार्थीनींसाठी:-**

३. सन २०२४-२५ मध्ये प्रथम वर्ष व थेट व्दितीय वर्ष प्रवेशित विद्यार्थीनींनी प्रगती शिष्यवृत्तीचे अर्ज दि. १०/१०/२०२४ रोजीपर्यंत भरावेत व महाडीबीटी पोर्टलवरील शिष्यवृत्ती अर्ज दि. १५/१०/२०२४ रोजीपर्यंत भरावेत. अर्ज भरल्यानंतर अर्जाची झेरॉक्स प्रत शिष्यवृत्ती विभागात विभागात देवून शिष्यवत्ती नोंदवहीत अर्ज जमा केल्याची स्वाक्षरी करावी.

- **अत्यंत महत्वाचे:-**

संस्थेतील सर्व विद्यार्थीनींना कळविण्यात येते की, ज्या विद्यार्थीनींनी शिष्यवृत्ती करीता पात्र आहेत परंतू ज्या विद्यार्थीनींनी दिलेल्या कालावधीत/ अंतिम दिनांकापर्यंत ऑनलाईन पद्धतीने शिष्यवृत्ती अर्ज भरले नसल्यास, संबंधित विद्यार्थीनींना शिष्यवृत्ती मंजूर होणार नाही व त्यांना संस्थेचे पुर्ण शैक्षणिक शुल्क रू. ६०००/- ( रू. सहा हजार ) भरावे लागतील. होणा-या आर्थिक नुकसानिस संबंधित विद्यार्थीनी जबाबदार राहील, याची गांर्भीयाने नोंद घ्यावी.

**टीप:- शिष्यवृत्ती योजनांची माहितीसाठी सोबत जोडलेले माहितीपत्रक वाचावे.**

(डॉ. कमलाकर माणिकराव बकवाड)
प्र. प्राचार्य,
शासकीय निवासी महिला तंत्रनिकेतन,लातूर

प्रत:- 1) सर्व विभागप्रमुख / शैक्षणिक समन्वयक / कुलमंत्री यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तव.
२) संस्थेच्या मुख्य सुचना फलकावर विद्यार्थीनींना माहितीसाठी.